९५९३०

उप आयुक्त बाल विकास

५

**बाल संगोपन योजनेचा निधी Cash Management Project (CMP) या सुविधेबरोबरच ECS/NEFT/RTGS या पद्धतीचा वापर करण्यात येऊन थेट लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा करणे बाबत**

**महाराष्ट्र शासन**

महिला व बाल विकास विभाग,

शासन परिपत्रक क्र. बालगृ- २०१५/प्र.क्र.३३१/का-८,

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : ०३,जानेवारी २०१७.

संदर्भ
१. शासननिर्णय म व बा वि क्र. बालसं २०११/प्र.क्र.३१३/का-८ दि. ९ ऑक्टोबर, २०१३.
२. शासननिर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण १०१०/प्र.क्र.६८/भाग-३/कोषा-प्र-५ दि. २२ जानेवारी,२०१३.
३. शासननिर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण १०१०/प्र.क्र.६८/भाग-२/कोषा-प्र-५ दि. ३१ जानेवारी,२०१३.
४. आयुक्तालयाचे पत्र मबाविआ/बावि/बाकस/का.५/.१५-१६/५७१२ दि. २८ ऑक्टोबर,२०१५.
५. समक्रमांकाचे परिपत्रक दि.१.१.२०१६
६. आयुक्तालयाचे पत्र मबाविआ/बावि/बालसंगो/का.५/१६-१७/६१०२ दि. २८ ऑक्टोबर,२०१५.

**परिपत्रक**

संदर्भाधिन क्रमांक ५ च्या परिपत्रकान्वये , बाल संगोपन योजनेच्या निधी प्रदानामध्ये अधिक पारदर्शकता येण्यासाठी कोषागारातून आहरण व संवितरण अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचे खात्यातून लाभार्थीचे बँक खात्यात Cash Management Project (CMP) मार्फत थेट जमा करण्यात यावा, असे आदेश संबंधितांना देण्यात आले होते. तसेच याबाबत अडचणी उद्भवल्यास आयुक्तालय, महिला व बाल विकास यांना अवगत करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार संदर्भाधीन पत्र क्र. ६ च्या आयुक्तालयाच्या पत्रान्वये बाल संगोपन योजनेचा निधी लाभार्थीच्या खात्यात CMP मार्फत जमा करण्यात येणा-या अडचणी शासनास कळविल्या असून ,सदर अडचणी लक्षात घेऊन, बाल संगोपन योजनेचा निधी कोषागारातून आहरण व संवितरण अधिकारी तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे खात्यातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करताना CMP प्रणालीबरोबरच ECS/NEFT/RTGS या प्रणालीद्वारे देखील जमा करणेबाबतचे निर्देश सदर परिपत्रकाद्वारे आता देण्यात येत आहेत. तसेच लाभार्थ्यांचे अनुदान वितरित करताना योग्य त्या तपशीलासह देयकासोबत शक्यतोवर आधारक्रमांक देखील नमुद करणेबाबतची दक्षता आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी, असे सूचित करणेत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुरेन्द्र प्र. चानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी